| | |
|---|---|
| **MHSO200011722025** | **नियमीत दिवाणी दावा नं.२२५/२०२५**<br>(दशरथ लेंडवे वि. शिवाजी लेंडवे व इतर) |

## निशाणी क्र. १३ खालील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांच्याविरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द होवून मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. अर्जात प्रतिवादींचे कथन की, वादी यांनी प्रतिवादी यांचेविरुध्द दावा डिक्लेरेशन, सरस निरस मानाने वाटपाचा व निरंतरचे ताकीदीसाठी दाखल केला आहे. प्रतिवादी नं. १ हे मजुरीनिमित्त परगावी असल्याने व मुदतीच्या आत वेळेत कागदपत्रे मिळाली नसल्यामुळे मुदतीत कैफियत व म्हणणे देता आले नाही. प्रतिवादी यांचेविरुध्द दि.२१/०८/२०२५ रोजी एकतर्फा हुकूम झालेला आहे. त्यामुळे प्रतिवादी यांचेविरुध्द झालेला एकतर्फाचा हुकूम रद्द होऊन त्यांनी सोबत दिलेली दाव्याची कैफियत स्विकारण्यात यावी, अशी विनंती केली आहे.

३. वादीने सदर अर्जाखाली आपले म्हणणे दिले की, सदरचा अर्ज खरा व कायदेशीर नाही. सबब, अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे. अर्ज मंजूर करणेचे झाल्यास जास्तीत जास्त कॉस्ट करणेत यावी.

४. प्रतिवादी यांचा अर्ज वाचला. वादींचे म्हणणे वाचले. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादीने प्रस्तुत दावा प्रतिवादी यांचेविरुध्द निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांनी मुदतीत हजर राहून कैफियत दिलेली नाही. त्यामुळे त्यांच्याविरुध्द एकतर्फाचा आदेश पारित झाल्याचे दिसून येते. प्रतिवादीने विलंबाबाबत अर्जात नमूद असलेले कारण संयुक्तिक वाटत नाही. विलंबाबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. परंतु, सदर दाव्याचे स्वरुप पाहता प्रतिवादी यांची कैफियत अभिलेखावर असणे दाव्याचा न्यायनिर्णय

गुणांगुणावर होण्यासाठी आवश्यक आहे.  तरी सदरचा दावा स्थावर मिळकती संदर्भात असल्यामुळे प्रतिवादी यांची कैफीयत अभिलेख सदरी असणे दाव्याचा न्यायनिर्णय गुणदोषावर  करणेसाठी अत्यंत आवश्यक आहे. प्रतिवादी यांनी आपल्या अर्जाचे पुष्टयर्थ नि.१४ खाली शपथपत्र दाखल केले आहे. तसेच नैसर्गिक न्यायतत्वानुसार प्रतिवादी यांना आपली बाजू मांडण्याची संधी देणे गरजेचे आहे. सबब, त्यांचेविरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द करणे व त्यांना कैफियत दाखल करण्यास परवानगी देणे न्यायोचित होईल. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज नि.१३ मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.१ यांना नि.क्र.१५ वरील आदेशाप्रमाणे खर्चाची रक्कम वादी यांना अदा केल्यानंतर  कैफियत दाखल करणेस परवानगी देण्यात येते.

PATIL ARTEE ASHOKRAO
Digitally signed by PATIL ARTEE ASHOKRAO
Date: 2026.01.03 15:16:50 +0530

(**श्रीमती ए.ए.पाटील**)

दि. ०२/०१/२०२६.

सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
सांगोला, जि. सोलापूर

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment/order :-

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | :- | Smt. S.S.Kolekar |
| (b) | Court | :- | Smt. A.A.Patil<br>Jt. Civil Judge Junior Division and Judicial Magistrate First Class, Sangola. |
| (c) | Judgment/Order signed by PO on | :- | 02/01/2026 |
| (d) | Judgment/Order uploaded on | :- | 02/01/2026 |